महापालिका आयुक्त कार्यालय
पुणे महानगरपालिका, मुख्य इमारत
शिवाजी नगर, पुणे -४११००५
Email-id- pmcmco@gmail.com.
जावक क्र -मआ/शअआ/प्र/७८२
दिनांक :- २३/०५/२०२०

## आदेश

विषय - पुणे महानगरपालिकेच्या हद्दीतील कोरोना विषाणूमुळे उद्भवलेल्या संसर्गजन्य रोगाच्या प्रतिबंधित क्षेत्रामधील पेठ बुधवार,गुरुवार, शुक्रवार, रविवार, भवानी, नाना या गावठाण दाट लोकवस्ती भागातील धोकादायक वाडे / मिळकतीबाबत.

संदर्भ - १) जुन्या/मोडकळीस आलेल्या इमारतीबाबत पावसाळ्यापूर्वी करावयाची कार्यवाहीबाबत महाराष्ट्र शासन,नगरविकास विभाग क्र वीसआ -२०१५/प्र.क्र ३४९/नवि/२० मंत्रालय मुंबई ३२ दि ५/११/२०१५ चे शासन परिपत्रक.

२)अधिसूचना, सार्वजनिक आरोग्य विभाग मुंबई क्र कोरोना २०२०/प्र.क्र.५८/ आरोग्य ५ दि.१४ मार्च २०२०

३) आपत्ती व्यवस्थापन कायदा २००५

४) भारतीय साथ रोग नियंत्रण अधिनियम १८९७

५) कोरोना विषाणू मुळे उदभवलेल्या संसर्गजन्य रोगाचा प्रतिबंध व नियंत्रण - पुणे महानगरपालिका क्षेत्रासाठी मा.महापालिका आयुक्त , पुणे मनपा. यांचे जा.क्र.मआ/साप्रवि/४९९दि. ०३.०५.२०२० रोजीचे सुधारीत आदेश व सर्वसाधारण मार्गदर्शक सूचना

६) कोरोना विषाणू मुळे उदभवलेल्या संसर्गजन्य रोगाचा प्रतिबंध व नियंत्रण - पुणे महानगरपालिका क्षेत्रासाठी मा.महापालिका आयुक्त , पुणे मनपा. यांचे जा.क्र. मआ/साप्रवि/१०३० दि. १९.०५.२०२० रोजीचे सुधारीत आदेश व सर्वसाधारण मार्गदर्शक सूचना.

ज्या अर्थी शासनाने संदर्भ क्र-२ अन्वये कोरोना विषयक उपाय योजना संदर्भात लॉकडाऊन बाबतच्या सुधारीत मार्गदर्शक सूचना निर्गत केल्या आहेत. त्या अनुशंगाने मी, शेखर गायकवाड , आयुक्त ,पुणे महानगरपालिका मला भारतीय साथ रोग अधिनियमानुसार प्राप्त झालेल्या अधिकारान्वये खालील प्रमाणे पुढील आदेश निर्गत करीत आहे.

<u>सूक्ष्म प्रतिबंधित क्षेत्रातील ( Micro Containment Zone ) जुन्या/मोडकळीस आलेल्या इमारतीबाबत पावसाळ्यापूर्वी करावयाची कार्यवाहीबाबत</u>

पुणे महानगरपालिका हद्दीतील पेठांमधील जुन्या/जीर्ण/मोडकळीस आलेल्या इमारती दरवर्षी पावसाळ्यात कोसळून जिवित वा वित्तहानी होते, यावर मा. राज्यशासना मार्फत शासन परिपत्रक ५/११/२०१५ रोजी मार्गदर्शक तत्वे पारित केलेली असून ती मा.राज्य शासनाने सर्व महानगरपलिकांना वितरीत केलेली आहेत. त्याप्रमाणे पुणे महानगरपालिकेमार्फत कारवाई सुरु करण्यात आलेली असून पुणे येथील दैनिक वृत्तपत्रामध्ये जाहीर प्रकटन देऊन मिळकत मालक /भोगवटाधारक यांना इमारत बांधकाम अभियंत्याकडून तपासणी करून इमारतीची दुरुस्ती करणे आवश्यक असल्यास संबंधितांस महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम २६४ (१)अन्वये इमारत दुरुस्तीची नोटीस देण्यात येते. आणि इमारत जीर्ण/मोडकळीस/धोकादायक असल्यास महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम २६८(बी) व (सी )अन्वये जागा खाली करणेस रहिवाश्यांना नोटीस देण्यात येते.त्याचप्रमाणे रहिवाशांनी जागा खाली केल्यानंतर जुन्या /जीर्ण/मोडकळीस इमारतीचे धोकादायक इमारतीचे धोकादायक बांधकाम पुणे महानगरपालिकेकडून उतरवून घेतले जाते.

संदर्भ क्र -१ चे शासन परिपत्रकातील मुद्दा क्र ३ नुसार जुन्या /जीर्ण/ धोकादायक इमारती रिकाम्या करण्यापूर्वी त्यामधील भाडेकरू/सदनिका धारकांच्या ताब्यात असलेले चटई क्षेत्रफळ मोजून त्यानुसार प्रत्येक भाडेकरू / सदनिकाधारक व मालक /सहकारी संस्था यांना पुणे महानगरपालिके तर्फे प्रमाणपत्र देण्यात येते.

पुणे महानगरपालिके तर्फे विषयांकित पेठांमधील धोकादायक वाड्यांना मिळकत रिकामी करण्यासाठी तसेच धोकादायक भाग उतरवून भागाची दुरुस्ती करणेसाठी नोटीसा बजाविण्यात आलेल्या आहेत.धोकादायक मिळकतीमध्ये न राहणेबाबत संबंधित मालक /भाडेकरू यांस समक्ष समज/सूचना देण्यात आलेली आहे.

पुणे शहरामध्ये यावर्षी कोविड-१९ विषाणू संसर्गजन्य साथ रोगाचा प्रसार थांबविण्यासाठी लॉकडाऊन जाहीर केलेला आहे. त्यामुळे विषयांकित नमूद पेठातील मिळकतीचे धोकादायक भाग उतरविण्याची कार्यवाही करता आलेली नाही. तथापि, लॉकडाऊन मधील शिथिलतेनंतर दि.११.०५.२०२० रोजी पासून पुणे महानगरपालिकेमार्फत सूक्ष्म प्रतिबंधित क्षेत्राबाहेरील मिळकतीचे धोकादायक भाग उतरविण्याची कार्यवाही सुरु केलेली आहे.

पुणे शहरातील कोरोना विषाणू मुळे उद्भवलेल्या संसर्गजन्य रोगाच्या नियंत्रणाकरीता दि.१९.०५.२०२० रोजी सुधारीत सूक्ष्म प्रतिबंधित क्षेत्र जाहीर करण्यात आले आहे. त्यापैकी सुक्ष्म प्रतिबंधित क्षेत्र क्र.६ मधील दाटवस्ती क्षेत्रामध्ये सोबतचे परिशिष्टानुसार काही मिळकती/वाडयाचा धोकादायक भाग उतरविणे आवश्यक आहे. सदरची कार्यवाही पावसाळ्यापूर्वी होणे अपेक्षित आहे, तथापि, संबधित मालक व भाडेकरू यांना समज वजा सूचना देऊन सुध्दा सदरचे मिळकत रिकामी न करता जिवितास धोका पत्करून जुन्या/जीर्ण/मोडकळीस आलेल्या मिळकती मध्ये भाडेकरू/मालक वास्तव्य करीत आहेत. त्यामुळे पुणे महानगरपालिकेस धोकादायक इमारती उतरवून घेण्यास अडचणी निर्माण होत आहेत.

मा.उच्च न्यायालय, मुंबई याचिका क्र- ११३५/२०१४ मध्ये मा.उच्च न्यायालयाने दिलेल्या आदेशाप्रमाणे संदर्भ क्र-१ चे शासन परिपत्रकातील मुद्दा क्र-६ नुसार जुन्या/जीर्ण/मोडकळीस आलेल्या खाजगी इमारतीतील रहिवाश्यांना स्थलांतरित करावयाची जबाबदारी पोलीस विभागाची आहे.

पावसाळा सुरु होणार असल्याकारणाने जुन्या/जीर्ण/मोडकळीस आलेल्या इमारती कोसळून जिवित वा वित्त हानी होण्याची शक्यता नाकारता येत नाही.त्यामुळे वरील परिस्थीतीत विशेषत पावसाळा तोंडावर आल्यामुळे पुणे शहरात जीवितहानी टाळण्यासाठी खालील प्रमाणे आदेश पारित करण्यात येत आहेत.

**"आदेश"**

"पुणे महानगरपालिकेच्या हद्दीतील सूक्ष्म प्रतिबंधित क्षेत्रामध्ये सोबत अनुसूची मधील अत्यंत धोकादायक मिळकतीचा भाग उतरविण्याकरीता व संदर्भ क्र-१ चे शासन परिपत्रकातील मुद्दा क्र-६ नुसार जुन्या/जीर्ण/मोडकळीस आलेल्या मिळकतीतील रहिवासी / भाडेकरूना स्थलांतर करण्यात यावे व बांधकाम विकास विभागामार्फत जुन्या/जीर्ण/मोडकळीस आलेल्या अत्यंत धोकादायक मिळकतीचा भाग पोलिस विभागाच्या मदतीने निष्कासित करण्याची कार्यवाही करण्यात यावी. हि कार्यवाही कोणत्याही परिस्थीतीत दि.५/६/२०२० पूर्वी पूर्ण करावी."

हा "आदेश" आज शनिवार, दि. २३.०५.२०२० रोजी माझ्या सही शिक्क्याने दिला आहे.

MUNICIPAL CORPORATION OF THE CITY OF PUNE
पुणे
म्युनिसिपल कॉर्पोरेशन
स्था.१९५०
ESTD 1950

( शेखर गायकवाड )
महापालिका आयुक्त
पुणे महानगरपालिका

प्रत:- १) मा.विभागीय आयुक्त, विभागीय आयुक्त कार्यालय, पुणे

२) मा.पोलीस आयुक्त, पोलीस आयुक्त कार्यालय, पुणे

३) मा.जिल्हाधिकारी तथा अध्यक्ष, जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण,

४) मा.शहर अभियंता, पुणे महानगरपालिका.

५) मा.पोलीस उप आयुक्त, परीमंडळ क्र -१, पुणे

यांजकडेस माहिती व पुढील आवश्यक कार्यवाहीसाठी अग्रेषित........

## पुणे महानगरपालिका

## बांधकाम विकास विभाग

## पुणे शहरातील प्रतिबंधित क्षेत्रातील धोकादायक बांधकामाचा तपशील

| अ क्र | पेठ | दिनांक | मिळकतीचा तपशील | महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम२६८(बी)व(सी) अन्वये दिलेली नोटीस /पत्र जावक क्र दिनांक |
|---|---|---|---|---|
| १ | भवानी पेठ | ८८८ | मोतीलाल हेमराज ओसवाल (भाडेकरू ) | जावक क्र/हातोहात दि २४/०६/२०१९ |
| २ | भवानी पेठ | ८८७ | मोहन ओसवाल इतर ३ | जावक क्र ७/१४१५ दि १५/०७/२०१९ |
| ३ | भवानी पेठ | २५९ ब | विनोद भंलगडीलाल हलवाई (मालक)भाडेकरू - टेचंदरम गायकवाड सुभाष ,चंद्रकांत ठक्कर | जावक क्र७/१८३४ दि.२३/७/२०१९ |
| ४ | कसबा पेठ | ८९८ | १)श्री.शाम ढवळे (मालक)<br>२)श्री.यशवंत तुळशीराम लोखंडे (मालक)<br>३)श्री रमेश दत्तोबा गजरे(भाडेकरू)<br>४)मुक्ताबाई दत्तोबा गायकवाड (भाडेकरू)<br>५)श्री पांढरी लोखंडे (भाडेकरू)<br>६)शुभांगी ढवळे<br>७)श्री सुनील नागपुरे (भाडेकरू)<br>८) श्री निर्मल वसंत साळुंके (भाडेकरू)<br>श्री संतोष भालेराव (भाडेकरू) | जावक क्र.७/१४६५ दि.१०/७/२०१९ |
| ५ | शुक्रवारपेठ | ४६७ / ६८ | मालक:१)नंदकुमार कृष्णाजी बांदल २)प्रकाश कृष्णाजी बांदल<br>भाडेकरू: १)प्रदीप गंगाधर बकरे २)मंगेय लक्ष्मण दंडेलू ३)माणिक राजाराम ४)अतिश येनगुल ५)तेजस करपे ६)आशिष सुधीर येनगुल ७)रोहित किशोर येनगुल ८)श्री विलास घन:शाम येनगुल ९)गणेश एम.(चंदी) १०)शैला चंद्रशेखर येनगुल ११)श्री अशोक बाळासाहेब कोंढरा | जावक क्र ७/२८८२ दि.३०/०९/१९<br>जावक क्र ७/२८९९ दि.१/१०/१९ |
| ६ | बुधवार पेठ | ११६८ | श्री श्रीनिवास पुरषोत्तम कुलकर्णी | जावक क्र ७ /२८६८ दि २७/०९/१९ |
| ७ | गुरुवार पेठ | ४२८ | भंवरलाल जैन ,श्री अंकित ओसवाल,श्री जाधव | जा.क्र.२३७४,दि.२/८/१६ |
| ८ | रविवार पेठ | ३४ | श्री.बोराडे(मालक),श्री बन्सल (भाडेकरू) | जावक क्र ७/१३१० दि ०२/०७/२०१९ |
| ९ | नाना पेठ | १४२ | १)दत्तात्रय राउत<br>२)शांताराम दिवेकर<br>३)किशोर रामदास कोलते | जावक क्र ७/२३७६ दि.१९/०७/२०१८ |
| १० | नाना पेठ | १८२ | श्री.वासिम अहमद अलंद | जावक क्र ७/५४९३ दि २६/०२/२०१९ |

(शेखर गायकवाड)
महापालिका आयुक्त
पुणे महानगरपालिका